# महाराष्ट्र शासन

क्रमांक:संकीर्ण/२०१७/प्र.क्र.१३४/जल-१
ग्राम विकास व जलसंधारण विभाग
हुतात्मा राजगुरु चौक,मादाम कामा मार्ग,
मंत्रालय,मुंबई-४०० ०३२.
दिनांक : २३ मे, २०१७

प्रति,

**जिल्हाधिकारी,**
**नाशिक**

**विषय : गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार योजनेंतर्गत इंधनाकरिता निधी वितरणाच्या कार्यपध्दती बाबत**

**संदर्भ : जिल्हाधिकारी नाशिक यांचे कार्यालयीन पत्र क्र.स्वीस/१८/जा.क्र.२५८६/२०१७, दिनांक १८.५.२०१७.**

उपरोक्त संदर्भाधीन पत्रास अनुसरुन आपणास असे कळविण्यात येते की, शासन पत्र क्र.संकीर्ण २०१७/प्र.क्र.१३४/जल-१, दि.१५.५.२०१७ मध्ये खालील प्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे :-

१) शासन पत्र दिनांक १५.५.२०१७ मधील मुद्दा क्र.८ मध्ये गाळ काढणे कामाचे देयक सक्षम स्तरावर पारीत केल्यानंतर, तालुका समितीने मान्यता दिल्यानंतर ग्राम सभेच्या मान्यतेनंतर संबंधितास अदा करावे या ऐवजी **"गाळ काढणे कामाचे चालू देयक सक्षम स्तरावर पारीत केल्यावर त्यास तालुका समितीने मान्यता दिल्यानंतर संबंधितास अदा करावे, तथापि अंतिम देयक अदा करण्यापूर्वी ग्रामसभेची मान्यता घेण्यात यावी." असे वाचावे.**

२) कामे सुरु करण्यापूर्वी क्षेत्रीय स्तरावर निधी देण्याबाबत जिल्हास्तरीय समितीने योग्य तो निर्णय घ्यावा.

३) गाळ काढण्यासाठी शासनाच्या मालकीचे जे.सी.बी. किंवा पोकलेन मशीनच्या एका गावातून दुसऱ्या गावात वाहतुकीसाठी उप प्रादेशिक परिवहन अधिकारी यांनी मंजूर केलेल्या दरानुसार खर्च करण्यास हरकत नाही.

वरील प्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

(एकनाथ डवले)
सचिव (जलसंधारण व रोहयो)

प्रति,

**सर्व जिल्हाधिकारी,**
**सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद,**
**मुख्य अभियंता (स्था.स्त.)जलसंधारण,पुणे,**
**सर्व अधिक्षक अभियंता (स्था.स्त.) जलसंधारण**